महाराष्ट्र शासन
स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
कोकण भवन,सहावा मजला,नवी मुंबई ४०० ६१४
☎ 🖷:- -022,27571391. E.Mail:- calfak6@yahoo.com

32414

## कार्यालयीन आदेश क्रमांक २ दिनांक 2 JAN 2010

विषय:- अनावश्यक विवरणपत्रे मुख्य लेखापरीक्षक कार्यालयास सादर करणे बंद करणे बाबत.

अनावश्यक विवरणपत्रे तयार करण्यात होणारा वेळेचा अपव्यय व त्यामुळे आवश्यक कार्यालयीन कामकाजावर होणारा परिणाम विचारात घेऊन सर्व विभागीय सहमुख्य लेखापरीक्षक यांनी अशाप्रकारे सादर करण्यात येणारी सर्व अनावश्यक विवरणपत्रे बंद करण्याबाबतचे प्रस्ताव संचालनालयास त्वरीत सादर करावेत. दिनांक १७ व १८ मे १९९० तसेच दिनांक २२ व २३ नोव्हेंबर १९९० रोजी अनुक्रमे श्रीवर्धन व अकोला येथे झालेल्या राज्यस्तरीय बैठकांचे इतिवृत्त पाहण्यात यावे. यापूर्वी निर्देश देऊनही बरीच अनावश्यक विवरणपत्रे सद्यस्थितीत पाठविण्यात येतात. त्यामुळे आता असे निर्देश देण्यात येत आहेत की, अशी अनावश्यक विवरणपत्रे मुख्य लेखापरीक्षक कार्यालयास सादर करण्यात येतात. त्याबाबत अलिबाग येथील नियोजित बैठकीत चर्चा करण्यात येईल. त्यास्तव आपले अभिप्राय तेव्हा सादर करण्यात यावेत.

(माणिक कौरथी)
मुख्य लेखापरीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य

प्रत:-
१. सहमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा,
मुंबई / नाशिक / पुणे / औरंगाबाद / अमरावती / नागपूर
२. उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा,
जिल्हा ------------------.

वि com hcl ASA letter १११०